ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.V/Nov 2011pp.1-4

Research Paper

# मराठवाडयातील तेलुगुभाषिक पद्मशाली यांचा बदकम्मा सण

डॉ. ललिता अलशटवार
पानसरे महाविद्यालय़ अर्जापूर .

*प्रस्तावना*

लोकसाहित्याचा समग्र अभ्यास करतांना लिखित किंवा मुद्रित साहित्य बरोबरच मौखिक साहित्याची ही परंपरा ध्यानात घ्यावी लागते . 21 व्या शतकात समाज झपाटयाने बदलत आहे . सांस्कृतिक व सामाजिक बदला सोबतच आर्थिक बदलही घडून येत आहेत . सर्व जग जवळ येवू पातह असतानाच एकमेकांचा प्रभाव विशेषतः राहणमान व विचार पध्दती यात बदल होत आहे . आपल्या परंपरा़ चालिरिती पाळत असतांना वेळेचा अपव्यय तर होत नाहीना असा विचार होवू लागला आहे किंवा परंपरा चालिरिती हया कालबाहय होवू लागल्या आहेत .

कारण चंगळवादामुळे व मनोरंजनाची अनेक साधने उपलब्ध होवू लागल्यामुळे तरंणांचा ओढ तिकडेच जात आहे . अशा या बदलत्या स्वरूपात परंपरा टिकवून ठेवणे व लोकसाहित्याच्या अभ्यासात मौखिक वाड .मयाचा ऱ्हास होत चाललेला आहे . हे वाड् .मय जर टिकून ठेवावयाचे असेल तर त्याचे मुद्रित स्वरूपात लिखाण होणे आवश्यक आहे . असा प्रयत्न अनेक लोकसाहित्य विशारदांनी केलेला आहे .

लोकसाहित्य अभ्यास मंडळाचे हे बहुमोल कार्य वाड .मय साहित्यात एक ऐतिहासिक ठेवा ठरत आहे .

प्रभाकर मांडे लोकसाहित्याच्या अभ्यासासंबंधीची आपली भूमिका मांडताना लिहितात . लोकसाहित्याचा अभ्यास हा लोकमाणसाच्या अविष्काराचा अभ्यास असल्याने लोकमानस ज्या विविध माध्यमातून अणिव्यक्त होते . त्या सर्वांचा विचार करणे कमप्राप्त असते . त्यामुळे लोकसामानसच्या शब्दबध्द अविष्काराबरोबरच लोकरूढ़ी लोकविश्र्वास़ विधी इत्यादी अभ्यास करणे आवश्यक असते . म्हणजे पर्यायाने हा अभ्यास लोकधर्म व लोकसंस्कृती यांचा अभ्यास ठरतो . लोककथेचा वर्गीकरणाचे प्राचिन व अर्वाचीन प्रयत्न प्रत्यक्ष अभ्यास सामग्रीचे वर्गीकरण करण्यापुर्वी लोककथा या लोक वाड .मय प्रकारांचे वर्गीकरण करण्याचे जे प्रयत्न व अर्वाचीन काळात झाले आहेत . त्यांचा संक्षिप्त आढावा घेण्यात आला .

कथाचे वर्गीकरण करतांना एकच कथा काही वेळा दोन वेगवेगळया प्रकारातही अंतर्भूत होवू शकते . वर्गीकरणातील सर्व अडचणी गृहीत धरूनही अभ्यासार्थ घेतलेल्या लोककथांचा आशय़ उद्देश़ परिणाम आणि रचना यांच्या दृष्टिकोन लोककथांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येते .

1 . दैवतकथाः दैवतकथा उत्पत्ती कथा व्रत कथा
2 . अद्भूत कथा
3 . दंतकथा ह्यअख्यायिकाह्
4 . वास्तव कथा
5 . स्पष्टीकरण कथा
6 . प्राणीकथा
7 . हास्यकथा
8 . मालाकथा
9 . संकीर्ण

लोककथा हा सर्वच शास्त्राच्या अभ्यासकांना कुतूहलाचा दिवस आहे . लोककथांचा अभ्यास त्यांची परदेशीय व भारतीय आशय कल्पनाबंध यांचा चर्चात्मक अभ्यास त्या विषयाचे संप्रदाय या सर्वाचाच विचार व रूपरेषा मांडण्याचा अत्यंत उपयुक्त असा प्रयत्न

1 . डॉ . सरोंजनी बाबर 2 . द ु ग ा ा ॅ भागवत 3 . डॉ . प्रभाकर मांडे
4 . शरद व्यवहार 5 . कलमाबाई देशपांडे 6 . डॉ . सौ . वैदेही कोळेकर

आख्यायिका ः मराठवाडयातील तेलुगुभाशिक पद्मशाली यांचा बदकम्मा सण

1 . ऐतिहासिक व्यक्तिचा व घटनांचा संबंध असलेला वर्ग
2 . भुताखेतांच्या कथा
3 . झपाटलेल्या घरांच्या व झाडांच्या
4 . विशिष्ट घराण्यांच्या आख्यायिकांचा वर्ग

असे चार वर्ग श्रीमंती दुर्गा भागवत यांनी स्थानिक कथांचे दिलेले आहेत . साधारणतः तसेच वर्ग येथील स्थानिक दंतकथांचे देता येईल .

दैवतकथा आणि अख्यायिका किंवा दंतकथा यातील सीमारेषा दाखविणे कठीण जाते . हे म्हणणे देखील योग्यच आहे . या स्थलांना एक प्रकारचे दैवत्व प्राप्त झालेले असते . येथे ऐतिहासिक व्यक्तिंचा संबंध असलेल्या आख्यायिका़ रामायण महाभारतातील व्यक्तिंच संबंध असलेल्या अख्यायिका वास्तविक पाहता़ प्रत्येक गांवात अशा प्रकारच्या आख्यायिका असतात . प्रत्येक शेतात़ दरीस़ मैदानास़ ओढयात नाव असतेच़ त्यापाठीमागे अख्यायिका दडलेली असतेच . या कथांचे विशेष पुढीलप्रमाणे सांगता येतील .

1 . रामायण महाभारत यातील महाव्यक्ती़ डोंगऱ दया यांच्या रूपाने आपले अस्तित्व कायम ठेवतात .
2 . इतिहासाशी संबंध जोडल्याने स्थळाला अधिराज्य असते .
3 . भुताखेतांचे त्या विशिष्ट अडचणीमुळे आपले मार्ग बदलतात .
4 . नद्या काही विशिष्ट अडचणीमुळे आपले मार्ग बदलतात .
5 . प्रत्येक देवताच्या ठिकाणी यात्रेच्या दिवशी काही विशिष्ट चमत्कार घडतात .

अशा प्रकारे कल्पनाबंध यात असतात . त्या अख्यायिकी एकाच गावात वेगवेगळया स्वरूपात ऐकावयास मिळतात . त्यामुळे त्या भाकडकथा वाटण्याची शक्यता असते परंतु त्यापाठीमागे वास्तविक निश्चित अशी परंपरा असते . त्यांच्या मुळाशी काही सत्यता असण्याची शक्यता नाकारता येत नाही . काही शिकार कथा सुध्दा अशा स्वरूपाच्या असतात . स्पष्टीकरणासाठी देखील त्या सांगितल्या जात असतील .

## बतकम्मा कथा :

आश्विन शुध्द ह्यअष्टमीह एक दिवस फार वर्षा पूर्वी धर्मागत नावाचा राज होऊन गेला त्याच्या बायकोचे नाव सत्यवती यांना शंभर मुले झाली पण एकही वाचू शकली नाही . शेवटी पतीपत्नीनी देवाचा धावा केला . तेंव्हा त्यांना एक मुलगी झाली . या मुलीला आशीर्वाद देण्यासाठी प्रत्यक्ष परमेश्वर भुतळी अवतरला आणि त्या मुलीच्या मस्तकावर हात ठेऊप म्हणाला ह्यनुवैना ब्रतकुअम्माह हबाळा तू तरी जगह या कारणाने बदकम्माचा सण तेलुगु समाजात करतात .

## बोडयम्मा :

हा उत्सवही मोठया उत्साहाने साजरा केला जातो . हा उत्सव पोळयाच्या दिवशी बैलाचे पडलेले शेण धरून सुरू करतात . दुर्सया दिवशीपासून शेणाचे गोळे करून यावर अनेक रंगीबेरंगी गवती फुलांची सजावट करतात . 5 बोडयम्मा मांडून बाजुला मुली फेर धरून गाणे म्हणतात . आणि गाणे म्हणून झाल्यानंतर ती शेणाची बदकम्मा भिंतीवर गवरीसारखी थापतात . व सहावी छोटी गोळी करतात . पाच बोडयम्मा भिंतीवर थापल्यानंतर या सहावी गोळी हातावर फेकत गाणे म्हणतात . या गोळीला सूर म्हणतात . अशा प्रकारे मुलही कंची बोडयम्मा करतात . जमिनीवर पाच लहान खोल खळगे करून त्यात फुले टाकून भोवती फेर धरून नाचताा . असा खेळ पाच दिवस चालतो .

प्रतिपदेपासून ते नवमीपर्यंत बोडयम्मा व दशमी ते अमावस्ये पर्यंत व्रतकम्मा असा हा उत्सव पंधरादिवस चालतो . बोडयम्मा शेणापासून तयार करतात . शेणवर फुले लावून गौरी म्हणून पुजतात . व्रतकम्मा ही गोर तयार करण्यासाठी वारूळाची माती लागते . या मातीची उंच ओबडधोबड मुर्ती करून त्यावर खुप फुले लावून फुलांची आरास करतात बायका व मुली यांच्या भोवती फेर धरून गाणी म्हणतात काही ठिकाणी मध्ये कलश व त्यावर गौर मांडतात या व्रतकम्माचे पूजेला रूद्राक्ष व दोडक्यांची फुले आवश्यक असतात . महाल्या अमावस्येला या व्रतकम्माचे तळयात नदीत डोहात विसर्जन करतात . त्यादिवशी कृत्रिम व्रतकम्मा कामठयाचे निमुळते गोल उंच साचा करून त्यावर रंगीबेरंगी कागदाची फुले टाकून ही व्रतकम्मा डोक्यावर घेवून स्त्रिया गाणी म्हणतात . तळयाकाठी वा नदीकाठी जावून पाण्यात उतरून त्याचे विसर्जन करतात .

व्रतकम्मा किंवा बदकम्मा या नावाच्या व्यत्पतीवरून असे वाटते की ही एक बालग्रहस्वरूप देवता असावी . तिच्या प्रतीकारसाठी वापरल्या जाणारी वारूळाची मातीही सुफलीकरण विधीच सुचवित . तेलुगुमध्ये व्रतकुटा याचा अर्थ जिवंत राहणे जगणे जसा आहे . मुलांना जिवंत ठेवणारी ती जिवंती असच व्रतकुटा पासुन व्रतकम्मा बनली . बोलीभाषा व च्या ऐवजी नुसते ब राहिले व त चे द झाले . त्यामुळे व्रतकम्मा ऐवजी ब्रतकम्मा हे नाव रूढ झाले . तेलंगण्यात एखाद्याला मुले जिवंत राहत नाही व मुलगी झाली तर तिचे नाव बदकम्मा ठेवतात . हे लक्षणिय आहे .

## बदकम्मा कथा :

एका वैश्य जोडप्याला एक मुलगा व एक मुलगी होती . मुलीचे नाव ब्रतकम्मा होती . मुलीला भावाने माहेती नेले . ती आश्विन शुध्द प्रतिपदेला माहेरी आली . तिचा पती तिला दशमीच्या दिवशी नेणार होता . ब्रतकम्मा शेजारी ज्ळदीकुकूवासाठी जाताना भावजयेची साडी नसून गेली . त्या साडीवर कुंकूवाचे डाग पडले . भावाजयीने नर्वयाजवळ आपल्या नंदेला मारून टाकण्याचा हट्ट धरला . भावान ब्रतकम्माला मारून जंगलात पुरले . त्या जागेवर सुंदर फुल उमलेल . तिचा नवरा तिला नेण्यासाठी येत असताना ते फुल वाटेत लागले व ते फुल त्याला बोलु लागले व खरा प्रकार तिच्या नर्वयाला सजला . त्याने तिला खोदून काढले . ती जिवंत होऊन दशमीला माहेरी गेली व अमावस्येला परत पतीसोबत गेली बोडू अम्मा ह्यप्रतिपदा ते नवमीह ब्रतकम्मा ह्यदशमी ते अमावस्याह हा उत्सव साजरा करतात . त्यांचे कारण ब्रतकम्माचे दोनदा माहेरपण झाले .

ब्रतकम्माच्या फेरावर जी गाणी म्हटली जातात . अनेक ठिकाणी त्यात अपभ्रंश होऊन व तेलुगु शब्दांचा प्रभाव गाणे बनलेले आहेत तर अनेक ठिकाणी ते भाषांतर वाटते .

## ह्यबतकम्मा तेलगू गाणेह

. . इद्दरू अक्का चेल्लेन्लू, आकारीची इच्वी उयाकी,
वच्चेना पोडू उयालो, येटला वस्तु चल्लेया उयाला,
येर आडम आये उयालो, येरूकु येडपती उयालो,
तलपुलाकू तालालू उयालो, तालालकू येंडी शिलालू उयालो,
येंडी शिलला नडमा येलवडी उयालो, येल बद्री चेटूकु उयालो,
येंडे मोग्गलू उयालो, येंडे मोग्गलू पती उयालो,
तक्याडू पती उयालो, कलराशी पोशी उयालो,
नेसने सालोडू उयालो, नेलकू ओका पोगू उयालो,
दिगने आ शिरे उयालो, दिगटील मिदा उयालो,
आ शिरा कटूकोनी उयालो, हंसाल बाई की उयालो,
हंसालअग्री कुडी उयालो, अंचु अंता चिंपे उयालो,
आ शिरे कटूकोनी उयालो काकुलांनी कुडी उयालो, कडवा चिल्ली कोटे उयालो,

## मराठी अनुवाद :

दोघी बहिणी जो जो, एका गावात दिले जो जो,
एकच आमचा भऊजी जो जो, येऊन तरी जाईना जो जो,
कस येवू बहिण जो जो, नदी आडवी आली जो जो,
नदीच्या काठी येमपल्ली ह्यगावह जो जो, शेत आडव आल जो जो,
शेताला नव्वद दार जो जो, दार आडे आले जो जो,
दाराला कुलूप जो जो, कुलूपाला चांदीची किल्ली जो जो,
चांदीच्या किल्लीत कापसाचे झाड जो जो, कापसाच्या झाडाला जो जो,
सात हातमाग जो जो, सात हातमाग कापड जो जो,
वजनदार कापूस जो जो, ते मापूस हे कापूस,
ढीग टाकला जो जो, पद्मशालीने विणले जो जो,
महिन्याला एक धागा जो जो, ती साडी नेसून जो जो,
दिवा लावून विणले जो जो, ती साडी नेसून जो जो,
हंस बाईला जो जो, सगळे हंस मिळून जो जो,
किनार फाडले जो जो, ती साडी नेवून जो जो,
कावळे सगळे मिळून जो जो, छिद्र फाडलेत जो जो,